MHNS160006962013

**<u>नियमित फौजदारी खटला क्र. ६९/२०१३ मध्ये निशाणी ९२ खाली आदेश</u>**

**सरकार वि. रंगनाथ शिंदे**

१. सदरचा अर्ज सरकारी पक्षाने दिलेला असून त्यामध्ये त्यांनी कथन केले आहे की, सदर प्रकरणातील साक्षीदार डॉक्टर दातीर यांना जमानती वॉरंट काढलेले होते. तथापि, त्याचा अहवाल अद्याप आलेला नाही. सदर प्रकरणातील एम.एल.सी. क्र. १८८०/१३ व एम.एल.सी. क्र. १८७९/१३ चे वैद्यकीय प्रमाणपत्र सिद्ध करण्यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक अधिकारी, नाशिक जिल्हा रुग्णालय नाशिक यांची साक्ष नोंदवणे गरजेचे असल्यामुळे त्यांना साक्षी समन्स काढण्यासाठी सरकारी पक्षाने सदरचा अर्ज दिलेला आहे.

२. त्यावर आरोपीच्या विधिज्ञांनी त्यांचे म्हणणे दिलेले असून अर्जातील कथने स्पष्ट शब्दात नाकारलेली आहेत. सरकारी पक्षाला पुरेशी संधी देऊन देखील सरकारी पक्ष वैद्यकीय साक्षीदाराची साक्ष नोंदवू शकले नाही. त्यामुळे सरकारी पक्षाला निशाणी ८९ कडील आदेशाप्रमाणे शेवटची संधी देण्यात आलेली होती. त्यामुळे सरकारी पक्षाचा पुरावा बंद करुन सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती आरोपीच्या विधिज्ञांनी केलेली आहे.

३. सरकारी पक्षाचा अर्ज व त्यावरील आरोपींचे म्हणणे वाचले. दोन्ही विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिपटलाचे अवलोकन केले असता सरकारी पक्षाच्या अर्जानुसार साक्षी समन्स काढून प्रस्तुत प्रकरणात एकूण ५ साक्षीदार तपासण्यात आलेले आहेत. सरकारी पक्षाने प्रस्तुतकामी वारंवार दिलेल्या अर्जानुसार वैद्यकीय अधिकारी डॉक्टर दातीर यांना समन्स/बी.डब्ल्यु काढले.

मात्र त्यानंतर देखील सदरील साक्षीदार अनेकदा संधी देऊनही प्रस्तुतकामी साक्ष देण्यासाठी हजर राहिलेले नाही. सदरचे प्रकरण अत्यंत जूने म्हणजेच सन २०१३ चे असून फेब्रुवारी २०२५ पासून सदरचे प्रकरण सरकारी पक्षाच्या उर्वरित पुराव्यासाठी प्रलंबित आहे. मा. उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांमध्ये हे स्पष्टपणे नमुद केले आहे की, एकाच स्टेजवर कोणतेही प्रकरण फार काळापर्यंत ठेवायचे नाही. असे असतांनाही सरकारी पक्षाला संधी देण्यासाठी प्रस्तुतचे प्रकरण फेब्रुवारी २०२५ पासून सरकारी पक्षाच्या पुराव्यासाठी प्रलंबित ठेवलेले आहे व सरकारी पक्षाच्या अर्जानुसार न्यायालयामार्फत वारंवार समन्स/वॉरंट देखील साक्षीदारांना काढलेले आहे. असे असतांनाही सरकारी पक्ष संबंधित वैद्यकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांची साक्ष नोंदवू शकले नाहीत. त्यामुळे निशाणी ८९ कडील सरकारी पक्षाच्या अर्जावर सविस्तर आदेश पारित करुन सरकारी पक्षाचा पुरावा नोंदवण्यासाठी त्यांना शेवटची संधी देण्यात आली होती. असे असतांनाही पुन्हा सरकारी पक्षाने सदरचा अर्ज दिलेला आहे. सरकारी पक्षामुळे विनाकारण मागील १ वर्षापेक्षा जास्त कालावधी पासून सदरचे प्रकरण प्रलंबित राहिल्याचे स्पष्टपणे दिसून येते. सरकारी पक्षाला स्पष्टपणे निर्देश देऊन देखील पुन्हा सरकारी पक्षाने सदरचा अर्ज दिल्याचे दिसून येते. जरी सदर प्रकरणात सरकारी पक्षाला वारंवार गरजेपेक्षा जास्त संधी देण्यात आलेली असली तरी पुन्हा नैसर्गिक न्याय तत्वाला अनुसरुन सरकारी पक्षाला शेवटची एकमेव संधी म्हणून सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरेल असे मला वाटते. सबब वरील सर्व विवेचनाच्या अनुषंगाने मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## – आदेश –

१. सरकारी पक्षाचा अर्ज शेवटची संधी म्हणून मंजूर करण्यात येतो.

२. सरकारी पक्षाच्या अर्जानुसार संबंधितांना साक्षी समन्स काढण्यात यावे.

३. सरकारी पक्षाला हे स्पष्टपणे निर्देशित करण्यात येते की, पुढील तारखेस ते संबंधित साक्षीदारांची साक्ष नोंदवू न शकल्यास सरकारी पक्षाचा पुरावा अंतिमतः बंद करण्यात येईल व कोणत्याही कारणास्तव सरकारी पक्षाला कोणतीही संधी दिली जाणार नाही.

४. सदरचे प्रकरण अत्यंत जूने असल्यामुळे दोन्ही विधिज्ञांना हे स्पष्टपणे निर्देशित करण्यात येते की, त्यांनी सदरचे प्रकरण जलदगतीने चालवावे.

SUNGARE VRUSHALI DINANATH
Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2026.01.23 12:03:38 +0530

दिनांक :– २३.०१.२०२६
ठिकाण :– चांदवड

(वृषाली दी. सुंगारे)
प्रथमवर्ग न्यायादंडाधिकारी,
क.स्तर चांदवड.